नॅक पुनर्मूल्यांकन : 'बी' ग्रेड

150 YEARS OF CELEBRATING THE MAHATMA

# राष्ट्रपिता महात्मा गांधी शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती वर्ष

रयत शिक्षण संस्था, सातारा 1919-2019

100 शताब्दी महोत्सव

रयत शिक्षण संस्थेचे

## कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा

जि.सोलापूर - ४१३ २०९

सन २०१८-१९

# महर्षी

# ।। क्षणचित्रे ।।



कर्मवीर जयंती सोहळ्यानिमित्त मार्गदर्शन करताना
मा.मिलिंद मोहिते, अप्पर पोलिस अधिक्षक, सोलापूर



कर्मवीर प्रतिमा मिरवणूक



रयत शताब्दी महोत्सवानिमित्त 'महाराष्ट्राच्या सुधारणा चळवळीत रयत शिक्षण संस्थेचे योगदान' या विषयावर व्याख्यान, वक्ते मा.प्राचार्य डॉ.महेंद्र कदम



रयत शताब्दी महोत्सवानिमित्त
आयोजित रक्तदान शिबीर



रयत शताब्दी महोत्सवानिमित्त आयोजित स्वच्छता रॅली



कर्मवीर जयंतीनिमित्त माजी प्राचार्य डॉ.पंजाबराव रोंगे यांचेमार्फत
दिल्या गेलेल्या भोजनाचा आस्वाद घेताना विद्यार्थी



रयत शताब्दी महोत्सवानिमित्त आयोजित माजी विद्यार्थी मेळाव्यात माजी विद्यार्थ्यांना संबोधित करताना संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मा.प्रभाकर देशमुख (माजी सनदी अधिकारी)



मंत्रमुग्ध माजी विद्यार्थी

रयत शिक्षण संस्थेचे,

# कला व वाणिज्य महाविद्यालय,
# माढा, जि.सोलापूर




# महर्षी

वार्षिक नियतकालिक सन २०१८-२०१९

प्रकाशक
**प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे**

प्रमुख संपादक
**प्रा. प्रकाश ताकभाते-पाटील**


# महाविद्यालय विकास समिती

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **मा.संजीव पाटील**<br>चेअरमन, मध्य विभाग, रयत शिक्षण संस्था, सातारा | .... | चेअरमन |
| २. | **मा.प्राचार्य डॉ.भाऊसाहेब कराळे**<br>सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा | .... | सदस्य |
| ३. | **मा.भाई गणपतराव देशमुख**<br>विधानसभा सदस्य, सांगोला | .... | सदस्य |
| ४. | **मा.ॲड.धनाजीराव साठे**<br>माजी आमदार व चेअरमन श्री.कुर्मदास सह.साखर कारखाना, लि.पिंपळदरा ता.माढा | .... | सदस्य |
| ५. | **मा.डॉ.रमण दोशी**<br>अध्यक्ष, सन्मति नर्सिंग होम, माढा | .... | सदस्य |
| ६. | **मा.प्रा.नानासाहेब लिगाडे**<br>चेअरमन, शेतकरी सह.सूतगिरणी, सांगोला | .... | सदस्य |
| ७. | **प्रा.प्रकाश ताकभाते-पाटील** | .... | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ८. | **प्रा.महेश गायकवाड (जाने.२०१९ पर्यंत)** | .... | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ९. | **प्रा.प्रेमचंद गायकवाड** | .... | प्राध्यापक प्रतिनिधी |
| १०. | **श्री.मारुती रणदिवे** | .... | शिक्षकेतर सेवक प्रतिनिधी |
| ११. | **प्रा.अशोक कदम** | .... | सदस्य |
| १२. | **प्रा.महादेव कोरी** | .... | समन्वयक |
| १३. | **मा.प्रभारी प्राचार्य डॉ.प्रतापकुमार उबाळे (१० मार्च २०१९ पर्यंत)** | .... | सचिव |
| १४. | **मा.प्राचार्य डॉ.सुरेश ढेरे (दि.११ मार्च २०१९ पासून)** | .... | सचिव |

## 'महर्षी' संपादक मंडळ (सन २०१८-१९)

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष व प्रकाशक | - | मा.प्राचार्य डॉ.सुरेश ढेरे |
| प्रमुख संपादक | - | प्रा.प्रकाश ताकभाते-पाटील |
| मराठी विभाग संपादक | - | प्रा.डॉ.नामदेव शिंदे |
| सहाय्यक संपादक | - | प्रा.चांगदेव जाधव |
| हिंदी विभाग संपादक | - | प्रा.नितीन गांगवे |
| सहाय्यक संपादक | - | प्रा.गवजी राऊत |
| इंग्रजी विभाग संपादक | - | प्रा.महादेव कोरी |
| सहाय्यक संपादक | - | प्रा.सौदागर शिंदे |
| फोटो संकलन | - | प्रा.डॉ.सतीश घाडगे |

जो वस्तीला आला...
त्याला ताटातला घास दिला...!



रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक

**पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील** डी.लिट्.

रयत शिक्षण संस्थेचे
कला व वाणिज्य महाविद्यालय,माढा

# रयतमाऊली



कर्मवीरांच्या सुविद्य पत्नी

## सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील



संस्थेचे आधारस्तंभ

**मा.शरद पवार साहेब**

अध्यक्ष,रयत शिक्षण संस्था,सातारा




आमचे मार्गदर्शक

**मा.डॉ.एन.डी.पाटील**


(डी.लिट्.)

# पदाधिकारी

रयत शिक्षण संस्था, सातारा



**मा.डॉ.अनिल पाटील**
चेअरमन



**मा.प्राचार्य डॉ.भाऊसाहेब कराळे**
सचिव




**मा.प्राचार्य डॉ.विजयसिंह जाधव**
सह सचिव, उच्च शिक्षण

## ◆ महाविद्यालयाचे आधारस्तंभ ◆



**सहकारमहर्षी कै.गणपतराव साठे**
माढा




**उद्योगपती कै.जयकुमार पाटील**
सोलापूर



**कै.नामदेवराव जगदाळे**
माढा

## ◆ आमचे देणगीदार ◆



**कै.वसंतराव साठे**
माढा



**कै.जनार्दनआप्पा चव्हाण**
उंदरगाव



**श्री.नागनाथ कदम**
माढा



**कै.योगीराज कुर्डे**
माढा



दूरगामी विचारांचे नेतृत्व
**प्राचार्य डॉ.सुरेश ढेरे**
(११ मार्च २०१९ पासून)



माजी प्रभारी प्राचार्य
**डॉ.प्रतापकुमार उबाळे**
(१० मार्च २०१९ पर्यंत)

## मा.प्राचार्य यांचे समवेत संपादक मंडळ



रयत शिक्षण संस्थेचे

# कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा



मा.प्राचार्य यांच्या समवेत
वरिष्ठ विभाग शिक्षक वर्ग



मा.प्राचार्य यांच्या समवेत
कनिष्ठ विभाग शिक्षक वर्ग



मा.प्राचार्य यांच्या समवेत
प्रशासकीय सेवक वर्ग



**प्रा.महादेव कोरी**
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे
पीएच.डी. पदवी प्राप्त



**प्रा.जयवंत पालकर**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ
सोलापूर पीएच.डी. पदवी प्राप्त



**प्रा.डॉ.मुधकर अनंतकवळस**
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
पीएच.डी. पदवी प्राप्त



**प्रा.डॉ.सुशील शिंदे**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
विद्यापीठ सोलापूरच्या
अधिसभेवर निवड



**प्रा.डॉ.प्रतापकुमार उबाळे**
प्रोफेसर पदी नियुक्ती

## ।। वर्गात प्रथम ।।


कु .सुषमा राऊत
बी.ए. भाग १


कु.प्राजक्ता ओहोळ
बी.ए. भाग २


कु.अमृता माने
बी.ए. भाग ३


कु.उज्ज्वला अवचर
बी.कॉम. भाग १


कु.पार्वती राऊत
बी.कॉम. भाग २


कु.अलिशा काझी
बी.कॉम. भाग ३


कु.सुप्रिया कदम
बारावी कला


कु.राधा अवचर
बारावी वाणिज्य


कु.अमृता रोटे
बारावी विज्ञान


कु.शितल चव्हाण
अकरावी कला


कु.पूजा शिंदे
अकरावी वाणिज्य


कु.सोनाली घोडके
अकरावी विज्ञान

# ।। काही अनमोल क्षणचित्रे ।।



**अजय पवार**
आंतर विद्यापीठीय
व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी विद्यापीठ
संघात निवड



**अक्षय पवार**
आंतर विद्यापीठीय
व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी विद्यापीठ
संघात निवड



**ओंकार पोरे**
आंतर विद्यापीठीय
व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी विद्यापीठ
संघात निवड



**शुभम चवरे**
उंच उडी प्रकारात
विभागीय स्पर्धेत
प्रथम क्रमांक



**राहुल जाधव**
आंतर विद्यापीठीय ज्युदो
स्पर्धेसाठी विद्यापीठ संघात निवड



**जीवन गोसावी**
उंच उडी प्रकारात विभागीय
मैदानी स्पर्धेत तृतीय क्रमांक



**सौरभ भुई**
४०० मीटर धावणे स्पर्धेत
विभागीय मैदानी
स्पर्धेत सहभाग



**प्रिया मस्के**
शालेय विभागीय ज्युदो
स्पर्धेत प्रथम क्रमांक व
राज्यस्तरीय
स्पर्धेसाठी निवड



**माढा नगर पंचायत यांच्या सहकार्याने इतिहास विभागामार्फत आयोजित दुर्मिळ नाणी प्रदर्शन**



**क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त व्याख्यान वक्ते ॲड.सौ.रेखाताई वाघमारे**

## प्राचार्यांचे मनोगत

सर्वसामान्य, बहुजन, वंचित आणि सर्वार्थाने मागास वर्गातील रयतेसाठी कर्मवीर अण्णांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करुन शिक्षणप्रसाराचा यज्ञ प्रज्वलित केला. याचाच एक अविभाज्य भाग बनून कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा कार्यरत, सेवारत आहे. विद्यार्थी केंद्रस्थानी ठेऊन महाविद्यालयाची वाटचाल सुरु आहे. रयतचे समाज परिवर्तनातील योगदान आणि रयतेची समृध्द परंपरा, इतिहास याचा प्राचार्य म्हणून माझ्यासह सर्वांना अभिमान आहेच. ग्रामीण अवर्षणग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण देऊन त्यांच्यामध्ये जीवन जगण्याची सक्षमता करण्याचा प्रयत्न महाविद्यालयात विविध उपक्रमांच्या माध्यमातून केला जातो ही आनंदाची बाब आहे.

आजच्या जागतिकीकरणाच्या युगामधील विद्यार्थी अधिकाधिक तंत्रस्नेही, कौशल्ययुक्त व्हावा याकरिता महाविद्यालय सातत्याने प्रयत्न करीत आहे. याचाच भाग म्हणून कौशल्य विकासाचे अभ्यासक्रम, प्लेसमेंट सेल, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विभाग कार्यरत आहेत. व्याख्याने, कार्यशाळा आणि चर्चासत्रे इ.च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ज्ञानसंपन्न घडविण्याचे कार्य होत आहे.

ग्रंथालय हा महाविद्यालयाचा अविभाज्य व महत्वाचा विभाग आहे. शिक्षकांसह विद्यार्थ्यांच्या ज्ञान, वाचन व माहितीमध्ये वाढ करण्यासाठी ग्रंथालयाची भूमिका महत्त्वपूर्ण असते. पाठ्यपुस्तके, संदर्भग्रंथ, कोश, नियतकालिके, NFLIBNET याद्वारे ज्ञानवृध्दीचे कार्य होत आहे.

महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग विविध उपक्रमांद्वारे सक्रियपणे सेवारत आहे. यावर्षी केवड, ता.माढा येथे रा.से.योजनेचे श्रमसंस्कार शिबीर संपन्न झाले. यामध्ये जलसंधारण, ग्रामस्वच्छता, आरोग्य जनजागृती, मतदार जागृती, महिला सबलीकरण, निर्मलग्राम योजना अशा विविध उपक्रमांचे नियोजन व प्रसार केला.

सांस्कृतिक विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक आणि नैतिक मूल्ये रुजविण्याचे कार्य वेगवेगळ्या उपक्रमांद्वारे होत असते. रयत शताब्दी महोत्सव उपक्रम, मार्गदर्शनपर कार्यशाळा याद्वारे विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास करण्याचा प्रयत्न केला. ओंकार धुमाळ याने सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. क्रीडा विभागाद्वारे विविध खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यापीठ, राष्ट्रीय स्तर यांवर विद्यार्थी खेळाडूंची कामगिरी समाधानकारक आहे. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राद्वारे मार्गदर्शन घेऊन अनेक विद्यार्थी आपली वाटचाल करीत आहेत. यावर्षी पाच विद्यार्थी इंडियन आर्मीमध्ये भरती झाले, ही बाब आमच्या दृष्टीने गौरवास्पद आहे.

महाविद्यालयामध्ये संशोधन करण्यामध्ये शिक्षकवर्ग आघाडीवर आहे. ICT द्वारे अध्यापन, प्रात्यक्षिकांसह अध्यापन यांमुळे विद्यार्थी अध्यायन-अध्यापन प्रक्रियेमध्ये अधिक सक्रियपणे सहभागी होत आहे. अर्थशास्त्र विभागातील डॉ.अनंतकवळस व इंग्रजी विभागातील डॉ.एम.एल.कोरी यांनी यावर्षी पीएच.डी. पदवी संपादन केली.

महाविद्यालयाचा कार्यलयीन विभाग कार्यतत्पर व अद्ययावत आहे. कीर्द, खतावणी, जमाखर्च, आवश्यक पत्रव्यवहार तत्परतेने पूर्ण होते. याशिवाय विद्यार्थी केंद्रस्थानी कार्यलयीन कामकाज असल्याने विद्यार्थ्यांना अधिकाधिक प्राधान्य दिले जाते. कार्यलयातील शिष्यवृत्ती विभाग, आर्थिक विभाग, विद्यापीठ व शासन पत्रव्यवहार विभाग योग्य पध्दतीने कामकाज करीत आहेत.

शेती विभागामुळे या महाविद्यालयाला एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. उपलब्ध शेती मध्ये विविध पिकांचे उत्पन्न घेतले जाते. शिवाय विद्यार्थ्यांना स्वावलंबी जगण्याचे धडे दिले जातात. ग्रामीण व अवर्षणग्रस्त अशा भागात शैक्षणिक कार्यप्रसाराची क्रांती महाविद्यालय करीत आहे. येथील विद्यार्थी शेतमजूर, कष्टकरी आणि वंचित कुटुंबातील आहे. त्यांना सक्षमपणे जगण्यासाठी, भारताचा उत्तम व संस्कारयुक्त नागरिक बनविण्यासाठी महाविद्यालयातील सर्वच घटक सातत्याने प्रयत्नशील असतात.

महाविद्यालयाच्या विकासामध्ये सर्वांचे योगदान महत्त्वाचे आहे. आजी-माजी विद्यार्थी, सेवक वर्ग, माढा शहरातील सर्व नागरिक, रयतप्रेमी, संस्थेचे सर्व पदाधिकारी यांचे वेळोवेळी मोलाचे सहाय्य लाभते.

महर्षी या नियतकालिकाद्वारे विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्यांचा विकास व्हावा; याकरिता त्यांचे लेखन प्रसिध्द केले जाते. विद्यार्थ्यांच्या सृजन पंखाला बळ देणारे ज्ञानपीठ व लेखनपीठ म्हणून महर्षी वार्षिक नियतकालिक कार्यरत आहे, याचा सर्वांना आनंद आहे.

विद्यार्थी ज्ञान व गुणसंपन्न व्हावा या दृष्टीने महत्त्वाचे प्रयत्न महाविद्यालय करीत असते. केवळ पारंपरिक शिक्षण न देता; कौशल्ययुक्त व रोजगाराभिमुख शिक्षणाची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावी यासाठी सर्वच विभाग कार्यरत आहेत. एकूणच महाविद्यालयाच्या प्रगतीविषयी अनेकजण समाधान व्यक्त करतात.

**डॉ.सुरेश ढेरे**

**प्राचार्य**

# संपादकीय

यंदाच्या वर्षी पाऊस सरासरीच्या मानाने बरा पडेल असा हवामान खात्याचा अंदाज आहे. हा अंदाज खरा ठरला तर बरे होईल. वस्तुत: पावसाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे आणि याला निसर्ग नव्हे, तर आपण सगळेच जबाबदार आहोत. निसर्ग त्याच्या नियमाने वागतो, पण आपण मात्र त्याच्या विरुध्द वर्तन करतो. आपण त्याच्यावर अवलंबून आहोत हे सोयीस्करपणे विसरतो.

पूर्वी निसर्ग सुसिस्थितीत होता. ऋतुमान व्यवस्थित होते. पुढे औद्योगिक क्रांती झाली. कामकरी माणसाची जागा यंत्रांनी घेतली. माणूस श्रमाच्या ऐवजी भौतिक सुखाच्या मागे धावू लागला. इंधनावर चालणारी वेगवेगळी वाहने आली. काँक्रिटच्या घरांनी झाडे, जंगले उध्वस्त केली. माणसाने धातूच्या भांड्यांऐवजी प्लॅस्टिकचा वापर सुरु केला. पुढे पुढे तर प्रत्येक गोष्टीसाठी प्लॅस्टिक पर्याय ठरले. नष्ट न होणारे प्लॅस्टिक एक शाप ठरले. या सर्व कारणांनी प्रदूषण वाढले. प्रदूषणामुळे जागतिक तपमान वाढले व निसर्गाचा समतोल ढासळत गेला.

जसजशी लोकसंख्या वाढत होती, तशी अन्नधान्याची गरज वाढत होती. शेतकरी उत्पादनवाढीच्या प्रयत्नात होता. पुढे संकरित बियाणे, रासायनिक खते व कीटकनाशकांचा शोध लागला. शेतीच्या उत्पादनात वाढ झाली पण रासायनिक खतांमुळे जमिनीचा पोत बिघडत गेला. पिकांवर फवारलेल्या रासायनिक औषधांमुळे माणसाच्या आरोग्यावर परिणाम होऊ लागला. नवनवीन आजार किंवा पूर्वी क्वचित दिसणारे आजार दिवसेंदिवस बळावत चालले व माणसाचे आयुष्यमान खालावत चालले.

शेतीसाठी पाण्याचा मुबलक उपसा सुरु झाला. शहरे मुबलक पाणी सांडू लागली. यामुळे जमिनीतील पाण्याचा साठा कमी होत गेला. पाण्याचा पुनर्भरणाचा आपण विचार केलाच नाही. आज पाण्याची पातळी खोलवर गेली आहे. पण जो तो पाणी उपसण्याच्याच नादात आहे. पुढे लोकसहभागातून ओढे, नाले यातील गाळ काढला गेला. शासनानेही बराच निधी खर्च केला पण जल संवर्धनाची ही कामे झाल्यापासून हवा तसा पाऊसच पडला नाही त्यामुळे त्याचा फारसा परिणाम दिसून आला नाही. आज अनेक गावांना टँकरने व शहरांना रेल्वेने पाणी पुरवावे लागत आहे पण पुढे पाणी आणायचे कोठून ? हा प्रश्न निर्माण होणार आहे. पाण्याबरोबरच शुध्द हवेचाही प्रश्न आहे. वाहनांच्या प्रदूषणाने ऑक्सिजन कमी होत चालला आहे. आवाजामुळे होणाऱ्या ध्वनी प्रदूषणाचा प्रश्न तर आणखी वेगळाच आहे. कारखान्यांच्या दूषित पाण्यामुळे जलचर प्राण्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. एकंदरीत निसर्गाचा सगळा समतोलच बिघडला आहे.

बिघडलेल्या निसर्गाला पुन्हा ताळ्यावर आणायचे असेल तर आपण केलेल्या चुका प्रथम सुधारल्या पाहिजेत. पर्यावरणाचा समतोल साधणाऱ्या वृक्षांचा आपण मोठ्या प्रमाणात नाश केला आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केली पाहिजे. आज पावसाळ्याच्या सुरुवातीला मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड होते सुध्दा ! पण यामागे प्रसिध्दीचा हेतू मोठा असतो. फोटो काढला की आपली जबाबदारी संपते. लावलेले वृक्ष किमान वर्षभर तरी आपण पाणी घालून जोपासले पाहिजेत हे कोणाच्या लक्षातच येत नाही व लावलेला वृक्ष काही दिवसातच सुकून जातो. पुढच्या वर्षी पुन्हा नव्या उत्साहाने त्याच खड्ड्यात फोटोसाठी वृक्षारोपण होते. लावलेल्या वृक्षांपैकी किती वृक्ष जगले याचा वर्षानंतर आढावा घेतला जात नाही. लावलेल्या वृक्षाच्या संवर्धनाची जबाबदारी आपलीच आहे हे जोपर्यंत समजत नाही तोपर्यंत त्या वृक्ष लागवडीला काहीच अर्थ रहात नाही.

सरकारने प्लॅस्टिक बंदी केली पण आजही अनेक गावात प्लॅस्टिक वापरले जात आहे. प्लॅस्टिक वापरामुळे नागरिकांना होणाऱ्या दंडाबरोबरच नष्ट न होणारे प्लॅस्टिक चोरुन कोठे तयार होते याचा शोध पोलिसांनी घेतला पाहिजे.

वाहनातील इंधनाच्या ज्वलनामुळे होणाऱ्या प्रदूषणास आळा घालण्यासाठी सौर ऊर्जेवरील वाहने वापरली गेली पाहिजेत. शेतीसाठी सुध्दा विद्युत मोटर ऐवजी सौर ऊर्जेवरील पंप शेतकऱ्याला परवडेल अशा माफक किंमतीत उपलब्ध झाले पाहिजेत. त्यासाठी सरकारने पुढाकार घेऊन शेतकऱ्यांना अनुदान दिले पाहिजे.

रासायनिक खते व मानवी आरोग्यावर परिणाम करणारी कीटकनाशके वापरली जाऊ नयेत म्हणून यावर बंदी आणली पाहिजे. यासाठी कडक कायदा व त्याची कडक अंमलबजावणी झाली पाहिजे. मोकळे पाणी न वापरता जे शेतकरी ठिबक सिंचन करतील त्यांनाच धरणाचे पाणी दिले पाहिजे. धरणातील गाळ हा शेतकऱ्यांना शासनाने मोफत दिला पाहिजे. पाण्याचे पुनर्भरण झाले पाहिजे हे सगळे केले तरच आपले जीवन भविष्यात सुखमय होईल.

नेहमीप्रमाणे 'महर्षी' च्या या अंकाचे स्वागत होईल ही अपेक्षा. ज्या विद्यार्थ्यांनी 'महर्षी' साठी लेख, कविता इ. साहित्य दिले त्यांना धन्यवाद ! अन्य विद्यार्थ्यांनी यातून प्रेरणा घेऊन साहित्य-लेखनाकडे वळावे. मार्गदर्शनाबद्दल मा.प्राचार्यांचे व सहकार्याबद्दल सहाय्यक संपादकांचे आभार !

दरवर्षी प्रमाणे अंक सुंदर, सुबक व नेटका बनविल्याबद्दल सातारा येथील प्रिंट ओम ऑफसेट व टाईप इनोव्हेटर्स या दोन्ही परिवारांचे आभार !

जयहिंद ! जय कर्मवीर !!

**प्रा.प्रकाश ताकभाते-पाटील**
**संपादक**

# महाविद्यालयातील पारितोषिके व पारितोषिक प्राप्त विद्यार्थी


| क्र. | पारितोषिकाचे नांव | पारितोषिक ठेवणाराचे नांव | पारितोषिक कोणासाठी | पारितोषिक प्राप्त विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| १. | सहकार महर्षी कै.गणपतराव साठे पारितोषिक | प्रा.डॉ.मोहन जाधव व माजी विद्यार्थी | बी.ए.भाग-३ या वर्गात प्रथम येणाऱ्यास | कु.माने अमृता सयाजी |
| २. | ———— | कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा | बी.ए.भाग-३ या वर्गात प्रथम येणाऱ्यास | कु.माने अमृता सयाजी |
| ३. | प्रा.सौ.मनुजा सोनार | कै.भास्करराव नारायणराव सोनार स्मृती पारितोषिक | बी.ए.भाग-३ या वर्गात भूगोल विषयात प्रथम येणाऱ्यास | कु.माने अमृता सयाजी |
| ४. | नारायण महादेव देशपांडे पारितोषिक | श्री.नारायण महादेव देशपांडे | बी.ए.भाग-३ या वर्गात मराठी विषयात सर्वप्रथम येणाऱ्यास | कु.रणदिवे मंजुश्री गणपत |
| ५. | कै.नामदेवराव जगदाळे स्मृती पारितोषिक | प्रा.प्रकाश ताकभाते पाटील | बी.ए.भाग-३च्या परीक्षेत हिंदी विभागात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास | कु.चव्हाण प्रियंका रवीन्द्र |
| ६. | बॅ.पी.जी.पाटील स्मृती पारितोषिक | कै.भीमराव लोंढे सार्वजनिक वाचनालय, चिंचोली, ता.माढा | बी.ए.भाग-३च्या परीक्षेत इंग्रजी विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास | कु.गरड मोहिनी नागनाथ |
| ७. | ———— | कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा | बी.कॉम.भाग-३च्या परीक्षेत सर्वप्रथम येणाऱ्यास | कु.काझी अलिशा उस्मान |
| ८. | कै.छगनलाल प्रेमचंद शहा स्मृती पारितोषिक | श्री.संकल्प छगनलाल शहा | बी.कॉम.भाग-३च्या परीक्षेत सर्वप्रथम येणाऱ्यास | कु.काझी अलिशा उस्मान |
| ९. | कै.विष्णूपंत शहाणे स्मृती पारितोषिक | श्री.नितीन विष्णूपंत शहाणे | बी.कॉम.भाग-३ या वर्गात प्रथम येणाऱ्यास | कु.काझी अलिशा उस्मान |
| १०. | ———— | कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा | बी.ए.भाग-२ या वर्गात प्रथम येणाऱ्यास | श्री.आहोळ प्राजक्ता कैलास |
| ११. | ———— | कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा | बी.कॉम.भाग-२ या वर्गात प्रथम येणाऱ्यास | कु.राऊत पार्वती अर्जुन |
| १२. | ———— | कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा | बी.ए.भाग-१ या वर्गात प्रथम येणाऱ्यास | कु.राऊत सुषमा हनुमंत |
| १३. | ———— | कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा | बी.कॉम.भाग-१ या वर्गात प्रथम येणाऱ्यास | कु.अवचर उज्वला शांतीनाथ |
| १४. | ———— | कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा | बारावी कला या परीक्षेत प्रथम येणाऱ्यास | श्री.कदम सुप्रिया अशोक |

| क्र. | पारितोषिकाचे नांव | पारितोषिक ठेवणाराचे नांव | पारितोषिक कोणासाठी | पारितोषिक प्राप्त विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| १५. | कै.यमुनाबाई सोपान जाधव स्मृती पारितोषिक | श्री.गणपत पुंडलिक जाधव, माढा | बारावी कला या वर्गात प्रथम येणाऱ्यास | कु.कदम सुप्रिया अशोक |
| १६. | ———— | कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा | बारावी वाणिज्य परीक्षेत प्रथम येणाऱ्यास | कु.अवचर राधा शिवाजी |
| १७. | कै.छगनलाल शहा स्मृती पारितोषिक | श्री.संकल्प छगनलाल शहा, माढा | बारावी वाणिज्य परीक्षेत प्रथम येणाऱ्यास | कु.अवचर राधा शिवाजी |
| १८. | ———— | कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा | बारावी विज्ञान परीक्षेत प्रथम येणाऱ्यास | कु.रोटे अमृता कल्याण |
| १९. | ———— | कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा | अकरावी कला परीक्षेत प्रथम येणाऱ्यास | कु.चव्हाण शितल चंद्रकांत |
| २०. | ———— | कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा | अकरावी वाणिज्य परीक्षेत प्रथम येणाऱ्यास | कु.शिंदे पूजा सौदागर |
| २१. | ———— | कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा | अकरावी विज्ञान परीक्षेत प्रथम येणाऱ्यास | कु.घोडके सोनाली प्रकाश |
| २२. | प्राचार्य नारायणराव भगरे पारितोषिक | प्राचार्य नारायणराव भगरे गौरव समिती, पंढरपूर | महाविद्यालयाच्या आदर्श विद्यार्थ्यास कायम ठेवीवरील व्याज | श्री.शेंडगे श्रीकांत लाला |
| २३. | प्राचार्य नारायणराव भगरे पारितोषिक | प्राचार्य नारायणराव भगरे गौरव समिती, पंढरपूर | महाविद्यालयाच्या आदर्श विद्यार्थिनीस कायम ठेवीवरील व्याज | कु.कदम रेवती रमेश |
| २४. | कै.प्रा.मुमताज रहिमतपुरे स्मृती पारितोषिक | डॉ.रमण दोशी, माढा | महाविद्यालयाच्या आदर्श विद्यार्थिनीस कायम ठेवीवरील व्याज | कु.शिंदे विद्या तानाजी |
| २५. | प्राचार्य कै.नामदेवराव वामन स्मृती पारितोषिक | प्रा.श्रीमती मालती नामदेवराव वामन पूणे | खेळातील मुलींच्या विशेष सहभागाबद्दल कायम ठेवीवरील व्याज | ———— |
| २६. | श्रीमती वालूबाई हिरालाल शहा स्मृती पारितोषिक | प्राणीमित्र श्री.विलास शहा, माढा | सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील आदर्श विद्यार्थिनी पुरस्कार रु.५०१/- | कु.पाटील पूनम सुनील |
| २७. | कै.विटाबाई गुंडू गायकवाड स्मृती पारितोषिक | प्रा.प्रेमचंद गायकवाड, माढा | बी.ए.भाग-३ वर्गाच्या परीक्षेत इतिहास विषयात प्रथम येणाऱ्यास | कु.चव्हाण मयुर दत्तात्रय |

## ।। राष्ट्रीय छात्र सेना ।।



वृक्ष संवर्धन



प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वज वंदनेस सज्ज छात्र



**जीवन गोसावी**
ज्युनिअर अंडर ऑफीसर



**बलवीर चांगभले**
सिनिअर अंडर ऑफीसर



**एस.डी.भुई**
सी.ए.टी.सी. कॅम्प



**तोहिद काझी**
आय.जी.सी. कॅम्प



**विकास राऊत**
आय.जी.सी. कॅम्प



**साहिल बोबडे**
सी.ए.टी.सी. कॅम्प



**शुभम जाधव**
आय.जी.सी. कॅम्प



**अमर सिरसट**
आय.जी.सी. कॅम्प



**अतुल गोसावी**
सी.ए.टी.सी. कॅम्प



**आकाश यादव**
सी.ए.टी.सी. कॅम्प



**केदार हजारे**
सी.ए.टी.सी. कॅम्प

रयत शिक्षण संस्थेचे
# कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा

## ।। राष्ट्रीय सेवा योजना : विशेष श्रमसंस्कार शिबीर ।।




'व्यसनमुक्ती व आरोग्य' या विषयावर व्याख्यान
वक्ते डॉ.सुभाष पाटील, माढा




'व्यसनमुक्ती व आरोग्य' अध्यक्षीय भाषण
डॉ.संदीप टोंगळे, माढा




'आम्ही जिजाऊ, सावित्रीच्या लेकी' या विषयावर व्याख्यान वक्त्या
मा.ॲड.सौ.मिनलताई साठे नगराध्यक्षा, माढा नगरपंचायत



ग्रामस्वच्छता करताना शिबीरार्थी



ग्रामस्वच्छता विषयक प्रबोधन करताना राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या
वेशात आमचे माजी विद्यार्थी श्री.फूलचंद नागटिळक (ग्रामीण कवी)




शिबीरार्थींना मार्गदर्शन करताना रयत शिक्षण संस्था
जनरल बॉडी सदस्य मा.बाळासाहेब पाटील, वरवडे



श्रमदान करताना शिबीरार्थी



शिबीर समारोप प्रसंगी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना
मा.दादासाहेब साठे संचालक कुर्मदास सह.साखर कारखाना लि. पिंपळदरा

## ।। क्षणचित्रे ।।




'लोकशाही व प्रशासन' या संदर्भात आमच्या विद्यार्थ्यांची माढा नगरपंचायत कार्यालयास भेट



राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना प्रा.डॉ.व्ही.बी.दंडे, दयानंद कॉलेज, सोलापूर



'काव्यशास्त्रावर विशेष व्याख्यान देताना के.एन.भिसे महाविद्यालय,कुर्डूवाडीच्या हिंदी विभाग प्रमुख प्रा.डॉ.सौ.मनिषा साळुंखे



अर्थशास्त्र विभागाची अभ्यास सहल



भूगोल विभागाचे विद्यार्थी व्हिलेज सर्वे करताना



भूगोल विभागातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल



'ऐतिहासिक पर्यटन व रोजगारातील संधी' या विषयावर व्याख्यान देताना वक्ते डॉ.प्रभाकर कोळेकर, इतिहास विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर



'माढा शहराचा इतिहास' या डॉक्युमेंटरी फिल्मचे प्रदर्शन

## ।। क्षणचित्रे ।।



पत्रकार दिनानिमित्त आयोजित
पत्रकार-विद्यार्थी संवाद कार्यक्रम



अर्थशास्त्र अभ्यासक्रम कार्यशाळा उद्‌घाटन प्रसंगी
मार्गदर्शन करताना प्रा.डॉ.उत्तम हुंडेकर, सोलापूर



प्राध्यापक प्रबोधिनीतर्फे आयोजित 'हाऊ टू युज ई- रिसोर्सेस'
या विषयावर व्याख्यान वक्ते ग्रंथपाल प्रा.महेश गायकवाड



अर्थशास्त्र अभ्यासक्रम कार्यशाळेत आपले विचार
व्यक्त करताना प्रा.डॉ.संतोष कदम



शिक्षक दिन



पारंपारिक दिनानिमित्त आयोजित 'शेला पागोटे' चा
आनंद घेताना विद्यार्थी




'जल संधारण' या विषयावर व्याख्यान देताना
जलतज्ज्ञ मा.अनिल पाटील




राष्ट्रीय मतदार जागृती रॅली

## ॥ विविध उपक्रम ॥



सहकार महर्षी के.गणपतराव साठे जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना
डॉ.शितलकुमार मुकणे (उपायुक्त, पशु संवर्धन, पुणे)



शिवजयंती उत्सव



स्पर्धा परीक्षा विभागाच्या उद्घाटनानिमित्त मार्गदर्शन करताना
प्रा.तुकाराम सोलापूरे (किंग मेकर ॲकॅडमी, बार्शी)



अविष्कार कार्यशाळेत उद्बोधनपर व्याख्यान, वक्ते प्रा.डॉ.प्रकाश व्हनकडे,
अर्थशास्त्र विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर



'रिसेंट ट्रेंडस् इन बँकिंग सेक्टर' या विषयावर बोलताना
मा.श्री.दीपक खाटके, फायनान्स मॅनेजर, स्टेट बँक, टेंभूर्णी




प्लेसमेंट सेल संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन
वक्ते मा.विवेक अजमान्य



ग्राहक जागृती अभियान अंतर्गत पथनाट्य सादरीकरण



मराठी वाङमय मंडळ उद्घाटन प्रसंगी
ग्रामीण कवयित्री सौ.विमल माळी यांचे काव्य वाचन

# विविध उपक्रम




वार्षिक पारितोषिक वितरण सोहळ्यात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूरचे प्राचार्य डॉ.अशोक भोईटे



अर्थ विचार मंचाचे उद्घाटन प्रसंगी उद्बोधन
करताना मा.प्रमोद शहा, भिसे महाविद्यालय, कुर्डूवाडी





ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त व्याख्यान
वक्ते डॉ.राजेंद्र गायकवाड, टेंभूर्णी



हिंदी दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना
प्रा.डॉ.दत्तात्रय अनारसे, के.बी.पी.महाविद्यालय, पंढरपूर



'मराठी मातृभाषा ते ज्ञानभाषा' या विषयावर बोलताना
प्रा.डॉ.राजाराम राठोड, के.बी.पी.महाविद्यालय, पंढरपूर




अंतर्गत तक्रार निवारण समिती तर्फे विद्यार्थिनींचे उद्बोधन
वक्ते प्रा.डॉ.सुशील शिंदे, माढा



उद्योजक विकास केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी माढ्यातील प्रसिद्ध
उद्योजक श्री.अशोक लुणावत मार्गदर्शन करताना



'वाणिज्य क्षेत्रातील बदल' या विषयावर विचार
व्यक्त करताना मा.निलेश मेहता